# प्रकरण तिसरे

## म. भा. भोसले यांच्या 'समरांगण' व 'उघड्या जगात' या कादंबऱ्यांतील ग्रामीण संस्कृतीचे चित्रण विशेष

# प्रकरण तिसरे

# म. भा. भोसले यांच्या ‘ समरांगण ’ व ‘ उघड्या जगात ’ या कादंबऱ्यातील ग्रामीण संस्कृतीचे चित्रण विशेष

## प्रास्ताविक

या आधीच्या प्रकरणात ग्रामीण संस्कृती आणि म. भा. भोसले यांच्या कथात्मक साहित्यातील ग्रामीण संस्कृती स्वरुप याचा विचार केला. आता प्रस्तुत प्रकरणामध्ये म. भा. भोसले यांच्या ‘ समरांगण ’ व ‘ उघड्या जगात ’ या कादंबऱ्यातील ग्रामीण संस्कृती चित्रणाचा विचार करावयाचा आहे.

आपल्या देशात हजारो वर्षापासून भारतीय शेती साहित्य आणि संस्कृती अस्तित्वात आहे. या तीन बाबी परकीयांना आकृष्ट करणाऱ्या ठरल्या. त्यांचे आक्रमण, अतिरेक आणि येथील वास्तव्य यांच्यातून देशाचा इतिहास घडत गेला. संघर्ष उद्ध्वस्तीकरण, राजेशाह्या, राजकारण यांच्या घडामोडींनी भारतीय समाज-जीवन, मानव जीवन भरुन गेले. यामध्ये शेती, साहित्य आणि संस्कृतीला खूप मोठी किंमत मोजावी लागली.

साहित्य संस्कृती यांचा इतिहास लिखित स्वरुपामुळे ज्ञात होतो. पण शेतीला किंमत किती मोजावी लागली. तिची गणती किंवा हिशोब कुणीच ठेवला नाही. भारतीय धरणी ही सुजला, सुफला होती. अशा धरणीचे आकर्षण परकीय लुटारुंना होते. परकीय लुटारुंचे सहस्त्रावधी सैन्य, त्यांचे गजदळ, अपबदल बाजारबुणगे हे शेतातून, रानातून, सुगीवर आलेल्या पिकातून धुडगूस घालत, राने पेटवून शेतकऱ्यांची घरे लूटत. त्यांच्या बायकापोरांना सक्तीने सेवेला व इतर सेवाकर्मांना वापरुन घेत असत. या अस्मानी- सुलतानी संकटांना शेती संस्कृती, ग्रामीण संस्कृती सतत तोंड देत होती.

प्राचीन युगातच नव्हे तर मध्ययुगीन काळातही शेतकऱ्यांची ही लयलूट चालूच होती. नंतर नंतर ब्रिटीश आमदानीत तर शेतकरी हा जमीनदार, सावकार आणि सरकार यांचा बळी

होत होता. या काळात धर्माच्या नावाखाली ब्राह्मण वर्ग, कर्ज आणि त्याचे अवाढव्य व्याज घेणारा सावकार, खंड, फाळा यांच्या नावाखाली लुबाडणारे जमीनदार आणि दुष्काळामुळे शेतकऱ्याला टेकीस आणणारी नियती हे चार घटक शेतकऱ्याला पिळून काढत होते. या काळातील शेतकऱ्यांचे जीवन प्रथम महात्मा फुले यांनी ' शेतकऱ्याचा असूड ' या आणि इतर ग्रंथात विस्ताराने उघडे केले. तसेच अनेक मान्यवर लेखकांनीही हे जीवनदर्शन घउविण्याचा प्रयत्न केला.

अशा परिस्थितीत स्वातंत्र्यपूर्व काळात म. भा. भोसले हे लेखन करीत होते. पण त्यांच्या लेखनावर इंग्रजी वाङ्मयाचा अजिबात प्रभाव पडला नाही. त्यांनी ग्रामीण जीवनातील परंपरानिष्ठ जीवन, पिढ्यान्‌पिढ्यांचे वैर, रंगेलपणा, रगेलपणा यांची व्यवस्थित चित्रणे रेखाटली.

ग्रामीण माणसाचं मन हे ग्रामीण निसर्गाचे अपत्य असते. या मनाच्या नैतिक आविष्कारातून ग्रामीण समाजाची आणि संस्कृतीची निर्मिती होत असते. ग्रामीण भावनात्मक श्रध्दाळू मनातून, ग्रामीण कला व देव-धर्म निर्मिलेले असतात. एकाच मनातून समाज, संस्कृती, कला आणि धर्म जन्मले असल्यामुळे त्यांच्यामध्ये परस्परसंबंध असतो. अर्थातच हे संबंध परस्पर पूरक आणि पोषक असतात. तेथील विशिष्ट निसर्गाशी व पर्यावरणाशी हे घटक घनिष्टपणे संबंधित असल्याने स्वत:ला केंद्रस्थानी ठेऊन विचार करणाऱ्या आणि स्वहिताच्या अंगानी ग्रामजीवनाविषयीच्या सुधारणांची मांडणी करणाऱ्या शहरवासी विचारवंताना बंदिस्त अभ्यासिकेत बसून हे जीवन सहसा कळणारे नसते. परंतु स्वत: हे ग्रामजीवन अनुभवणाऱ्या म. भा. भोसले यांच्या लेखनात दैनंदिन ग्रामजीवनातील अनुभवांचा व कल्पनांचा आविष्कार त्यांच्या कांदबरी लेखनात दिसून येतो. कृषिकेंद्रित वास्तव हा ग्रामीण भावविश्वाचा गाभा अस्सल कल्पकतेने व बोलीच्या लयीने अविष्कृत करणाऱ्या त्यांच्या कादंबऱ्या आहेत. वैचित्र्यपूर्ण अनुभवसृष्टी आणि भाषेवरील पकड ही त्यांची गुणसंपदा डोळस वाङमयीन जीवनामधूनच आकार घेते. त्यांच्या ' समरांगण ' व ' उघड्या जगात' या दोन कादंबऱ्यातून प्रतिबिंबित झालेले ग्रामीण जीवन चित्रण विशेष अभ्यासणे हा प्रस्तुत लघुप्रबंधाचा हेतू आहे. त्याची मांडणी पुढील विवेचनात केली आहे.

## म. भा. भोसले यांच्या कादंबरीतील ग्रामीण संस्कृतीचे चित्रण विशेष

### ' समरांगण ' कादंबरीतील शेतकरी जीवन

म. भा. भोसले अस्सल ग्रामीण लेखक होते. त्यांच्या नसानसात ग्रामीण जीवनाचे सत्त्व भरलेले होते. तशी त्यांची वृत्तीच बनली होती. त्यांच्या कोणत्याही निर्मितीत कसलीच कृत्रिमता नाही. सुक्ष्म अवलोकन, ग्रामीण जीवनाचा अकृत्रिम जिव्हाळा, आपलेपणा आणि सहजानुभव म्हणून त्यांनी जे अनुभवले, भोगले तेच त्यांच्या लेखणीतून समर्थपर्ण प्रसवलं आणि साकारले आहे. यातूनच ' समरांगण ' ही कादंबरी अवतरली आहे.

खेडेगावातील शेतकरी जीवन किती कष्टाचे आहे ? खेड्यातला आजचा जमीनदार वर्ग शेतकऱ्यांना कसा पिळून काढीत आहे ? याचे यथार्थ चित्रण भोसले यांनी या कादंबरीत रंगविले आहे. कादंबरीतील खलपात्र सावकार बापूसाहेब यांच्या शेतात राबवणाऱ्या गरीब कष्टकऱ्यांचे बापूसाहेबांकडून होणारे शोषण, त्यांची पिळवणूक या कादंबरीत पावला पावलाला दिसते.

ग्रामीण भागात असंख्य प्रश्न निर्माण होतात. नदीला पाणी वाढते तेंव्हा शेतकऱ्यांना आपले घर सोडून रावसाहेबांनी दिलेल्या वाड्यात रहावे लागते. परंतु शेतकऱ्यांचे तिथे राहणे बापूसाहेबांना मान्य नसते. बापूसाहेब सर्व शेतकऱ्यांना भर पावसात बाहेर काढतात. अशाचवेळी या अन्यायाला वाचा फोडून वाड्याला हंबीर हा शेतकरी आग लावून देतो. या प्रसंगातून शेतकरी विरुध्द सावकार यातील प्रसंग चित्रित झालेला आहे. तसेच ग्रामीण भागातील अन्याय, अत्याचारामुळे शेतकऱ्यांच्या वाट्याला येणारे दु:ख याचेही चित्रण कादंबरीत करतात.

या कादंबरीत प्रामुख्याने जमीनदार आणि शेतकरी या वर्ग युध्दाच्या समरांगणावर जमीनदार बापूसाहेब आणि त्यांचा मुलगा भगवान या दोघांचा लढा उभा केला आहे. वडिलांच्या इच्छेविरुध्द भगवान मुंबईच्या संपाचा पुढारी होतो. पुढे नदीला पूर येऊन गरीब शेतकऱ्याची घरे वाहून जातात, तेंव्हा निराश्रितांना भगवान आपला जुना वाडा रहायला देतो. पण

बापूसाहेब त्या लोकांना हाकलून देतात. त्यावेळी मात्र गरीब लोक संतापाने जाळपोळ करतात. शेतकऱ्यांना अन्न मिळत नाही. ते बापूसाहेबांच्या दारासमोर सत्याग्रह करतात आणि तेही भगवानच्या नेतृत्वाखाली. धान्याचे पेव खणून आपल्या पोटाचा प्रश्न सोडविण्याचा उपक्रम गांजलेले शेतकरी करतात असे शेतकऱ्यांच्या संघर्षाचे जीवन दर्शनही कादंबरी घडवते.

ग्रामीण जीवनात अनेक प्रश्न निर्माण होतात. अशा प्रश्नांना वाचा फोडताना या कादंबरीचा नायक म्हणतो, " तुम्ही अर्धपोटी फुकट राबणं अन् त्यांनी तुम्हांला फुकट राबविणे हा सलोखाच वाटतं ? सलोखा समान पातळीतल्या माणसांचा होतो. शिखरावर बसलेल्या माणसांचा अन् त्याच शिखरावरच्या तळाशी धडपडणाऱ्या माणसांचा सलोखा होणं कधीही शक्य नाही. खालच्यांना वर जाता येत नाही अन् वरच्यांना खाली यायची इच्छा नाही. मग सलोखा होणार कसा ? याला उपाय एकच आहे !

ते शिखर ढासळणं !" [१]

वरील उद्‌गारातून ग्रामीण जीवनात जाणवणारी गरीब-श्रीमंत, जमीनदार आणि शेतकरी यांच्यातील दरी किती रुंद आहे हे दाखविले आहे. यातूनच ग्रामीण जीवनातील वास्तवता सिध्द होते.

सावकारच्या घरात जन्माला येऊनही उच्चनिच्चता अथवा मालक-मजूर असा भेद न मानता भगवान हा गरीब शेतकऱ्यांना संकट प्रसंगी मदत करतो. पुराच्या वेळी शेतकऱ्यांना निवारा मिळवून देणे, रोगराई आजाराने पिडीत लोकांना अन्न उपलब्ध करुन देणे, कुळांना कष्टाचा मोबदला स्वत:च्या वडिलांकडून मिळवून देणे या अनेक प्रसंगातून ग्रामीण जीवनात उच्चनीच्चतेपेक्षा माणूसकी हे श्रेष्ठ मूल्य असते हे या कादंबरीतून प्रभावितपणे बिंबवण्याचा प्रयत्न लेखकांनी केला आहे.

ग्रामीण भागात आढळणारा सावकारी पाश, थाट, पाशवी वृत्ती ग्रामीण वास्तविक जीवन दर्शविते. यात्रेच्या वेळी भगवानला बापूसाहेब चित्रपट पाहण्यास नेतात. तेंव्हा चित्रपटाबद्दल घडलेला दोघांतील संवादातून बापूसाहेबांची पाशवी वृत्ती जाणवते. तसेच

हंबीर विरूध्द साक्ष देण्यासाठी शेतकऱ्यांना घातली जाणारी अट म्हणजे सावकारी वचक बसवण्याचाच प्रयत्न दिसतो. तर जमीनदाऱ्यांची रीत ही दोन-चार बायका ठेवणे हे शिरस्ताही बापूसाहेबांनी पाळलेला आढळतो. एकूण अस्सल ग्रामीण घरंदाज जीवन दर्शविले आहे.

मोठ्या उंची जमीनदार वर्गातील कर्त्या स्त्रीची होणारी मनाची कुचंबणा यात यशोदा व तारा या व्यक्ती चित्रणाद्वारे सिध्द केल्या आहेत. या व्यक्तीरेखेतून ग्रामीण भागातील वास्तव स्त्री-जीवन विशद केले आहे.

ग्रामीण समाज तिथले रितीरिवाज, तिथली माणसे, निसर्ग जगण्याची तऱ्हा या गोषटी निश्चित निराळ्या असतात. त्या कृषिसंस्कृतीशी निगडीत असल्याने ग्रामीण समाज थोडा वेगळा पडतो. अशा समाजाच्या भावभावना म. भा. भोसलेंनी आपल्या समर्थ लेखणीतून चितारल्या आहेत.

ग्रामीण भागातील जनजीवन कसे असते हे त्यांना चांगले ठाऊक होते. कारण ते स्वत: शेतकरी कुटुंबातले होते. त्यांना शेतकरी जीवन जवळून अनुभवता आले. म्हणूनच ग्रामीण जीवनाचे अस्सल चित्रण त्यांनी आपल्या ' समरांगण ' या कादंबरीतून केले आहे.

**'समरांगण ' मधील दारिद्रयाचे वास्तव चित्रण**

स्वातंत्र्य प्राप्तीनंतरही खेड्यातील शेतकऱ्यांची दारिद्रयाची अवकळा संपली नाही. हा खेडूत अनेक वर्षे सावकारीच्या शोषणाने गरीबीच्या दरीत खोलवर कोसळला गेला. या ग्रामीण संस्कृतीवर औद्योगिकतेचे होणारे आक्रमण यामुळे खेड्यातील बळीराजा उध्वस्त झाला आहे. दुष्काळ, महापूर, नैसर्गिक कारणाने होणारी हानीमुळे शेतकऱ्यांच्या नशिबी येणारे दारिद्रय कधी थांबलेच नाही. तसेच स्वातंत्र्य प्राप्तीनंतरही राजकारणासाठी या कृषकांचा बळी आजही दिला गेलेला दिसतो. शेतात पेरलेले धान्य घरापर्यंत येत नाही. त्यामुळे शेतकरी दारिद्रयात खितपत पडला आहे. शेतकऱ्याच्या वाट्याला पिढ्यान्‌पिढ्या येणाऱ्या दारिद्रयानेच त्याल दु:खी कष्टी बनवले आहे. अशा दारिद्रयाचे दर्शन म. भा. भोसले यांच्या ' समरांगण ' या कादंबरीत प्रभावाने दिसते.

ग्रामीण संस्कृतीच्या वास्तवतेचे दर्शन घडते ते ग्रामीण भागातील दारिद्रयात या कादंबरीत नैसर्गिक आपत्तीमुळे व बापूसाहेबांच्या अन्यायामुळे गरीब शेतकऱ्याच्या वाट्याला आलेल्या दारिद्रयाचे दर्शन घडते. गरीब शेतकऱ्यांना नदीला पाणी वाढल्यावर निवारा मिळत नाही. त्यामुळे ' गणू ' हा या दारिद्रयाचा बळी ठरतो. दारिद्रयात गरीबीत जन्म घेणे म्हणजे जणू गुन्हाच आहे असे हंबीर म्हणतो. ' अगं, जग हाच एक मोठा तुरुंग आहे. ' गरीब हे या तुरुंगातले कैदी. अन् श्रीमंत हे पोलीस. त्यांनी या कैद्यांना वाटेल तसं छळावं !''[२] एकूणच गरीबांच्या जीवनाचे कटू सत्यच हंबीर आपल्या वक्तव्यातून स्पष्ट करतो आणि तेही शेतकरी-कूळ आणि सावकार यांच्यातील संघर्ष हा या कादंबरीचा मुख्य विषय आहे.

दारिद्रय हे गरीब शेतकऱ्यांच्या पाचवीलाच पूजलेले होते. या दारिद्रयाचाच फायदा घेऊन बापूसाहेब शेतकऱ्यांची पिळवणूक करीत असलेले दिसतात. बापूसाहेबांच्या मताप्रमाणे शेतकऱ्यांनी हंबीर विरुध्द साक्ष न दिल्यास या शेतकऱ्यांना आश्रमातून काढून टाकले जाईल. जी जमीन पिकवून ते जीवन जगतात त्या जमीनीही काढून घेतल्या जातील अशी अट शेतकऱ्यांना ते घालतात. इतकेच नव्हे तर या शेतकऱ्यांच्या दारिद्रयाचा फायदा घेऊन आग लावलेल्या वाड्याच्या कामावर काम संपेपर्यंत पाळीपाळीने फुकट राबायचेही कबूल करुन घेतात. केवळ दारिद्रयामुळेच शेतकऱ्यांच्या नशिबी ही वेळ आली याचे वास्तव चित्रण भोसले यांनी या कादंबरीतून केले आहे.

शेतकऱ्यांमध्ये प्राप्त परिस्थितीशी व प्रसंगाशी सामना करण्याचे बळ दारिद्रयामुळेच येते. गरीब शेतकरी खायला अन्न नसतानाही केवळ भाकरीच्या कोरडा तुकडा खाऊन विना पगार वाड्याच्या कामासाठी राबत असलेला दिसतो.

या कादंबरीत काबाडकष्ट करुन जीवन जगणाऱ्या एका ग्रामीण गरीब आईचे चित्रण येथे येते. येथे आई आपल्या आजारी मुलाच्या आरोग्यासाठी आवश्यक गरजा दारिद्रयामुळे पूर्ण करु शकत नाही. परंतु तिच्या घरी पुरुष नसल्याने मजूरी देऊन तिला वाड्याच्या कामावर गडी पाठवावा लागत असे. त्यातून गरीब विधवा स्त्री च्या वाट्याला दारिद्रयामुळे

कसे दु:खी जीवन येते हे समजते. यातून ग्रामीण भागात आढळणारे कटू सत्य म. भा. भोसले यांनी या कादंबरीतून चित्रित करण्याचा प्रयत्न केला आहे.

**'समरांगण ' मधील शेतकरी जीवनातील संघर्ष**

'' आपल्या दृढमूल झालेल्या अनेकविध विरोधांमुळे जीवनाला साहजिकच समरांगणाचे स्वरुप प्राप्त झाले आहे. स्पृश्य-अस्पृश्य, हिंदू-मुसलमान, ब्राह्मण-ब्राह्मणोत्तर, मालक-मजूर, जमीनदार-कुळे इत्यादी द्वंद्वांच्या तडाख्यात समाज अगदी जर्जर झाला आहे. या अवनतीला पायबंद घालण्यासाठी आणि नव्या परिस्थितीनुसार नवी समाज रचना निर्माण करण्यासाठी जो मनुष्य प्रयत्न करु लागतो. त्याला तीव्र विरोध आणि आत्यंतिक हालअपेष्टांचा सामना करावा लागतो. अशा प्रकारे झगडणाऱ्या एखाद्या व्यक्तीचे जीवन हे एखाद्या उत्कृष्ट कादंबरीचे कथानक होऊ शकेल. श्री. भोसले यांची ' समरांगण ' ही कांदबरी हा असाच एक अभिनंदनीय प्रयत्न आहे. ''[३] असे या कादंबरीविषयी म्हंटले गेले आहे.

' समरांगण ' या कादंबरीतील येणारा संघर्ष हा भांडवलशाही विरुध्द गरीब शेतकरी कष्टकरी असा चित्रित केलेला दिसतो. जो सर्व मानवी जीवनामध्ये सुरु असतो. जगातील भांडवलशाही समाज रचना नष्ट होऊन समतेचा विजय व्हावा या दृष्टीने मुंबईच्या गिरणी कामगारांचा हा लढा भगवानच्या अधिपत्याखाली चाललेला दिसतो. अशा संघर्षात नेहमी सत्याचाच विजय होत असलेला दिसतो. हजारो माणसांच्या पोटापाण्याचा प्रश्न घेऊन लढणाऱ्या या राजकुंवर गिरणीतल्या मजुरांचा ग्रामीण व शहरी भागात आढळणारा मालक-मजूर संघर्ष येथे मुंबई गिरणी कामगारांच्या संपाद्वारे चित्रित झाला आहे.

या कादंबरीत सावकाराशी संघर्ष करायला निघालेला हंबीर दिसतो. शेतात राबून कष्ट करणाऱ्या पण आपला हक्क हिरावून घेतला जातो तेंव्हा पेटून उठणारा, आणि प्रसंगी सावकारालाही आव्हान देऊन त्याचा सूड घ्यायचा म्हणून वाड्याला आग लावणारा हंबीर हा कष्टकरी शेतकऱ्यांचा नेता आहे. या साऱ्या संघर्षमय जीवनाचे चित्रण म. भा. भोसले यांनी मोठ्या ताकदीने केले आहे.

बापाविरुध्द त्याचे औरस व अनौरस मुलगे यांचा झगडा हा या कादंबरीत रंगविला आहे. त्याकरीता बापाला सावकाराची भूमिका लेखकाने दिली असून, तो सावकार ज्या गरीब लोकांना छळतो त्यांच्या कैवाऱ्याची भूमिका मुलांनी बंडाचे निशाण उभारणाऱ्या भगवान व सुरेंद्र या दोन भावाकडे देऊन कथानक उद्‌बोधक बनवले आहे.

' जीवन हे जगण्यासाठी नसून जगविण्यासाठी आहे.' हे सूत्र घेऊनच कादंबरीतील सर्व प्रसंग खेळविले आहेत. यातील शेतकरी दुष्काळामुळे गांजलेले आहेत. खंड देण्याची कुवत त्यांच्यात उरलेली नाही. खावयाला अन्नही त्यांच्यापाशी नाही अशी स्थिती असते. तशातच प्लेगची साथ सुरु होऊन त्याचे पटापट बळी पडू लागतात. डॉक्टरसाहेब आणि भगवान व त्यांचे साथी त्यांना मदत करतात. पण घरात अन्न नसल्यावर कोरड्या मदतीचा काय उपयोग ? अशावेळी भगवानला प्रत्यक्ष पित्याशीच द्वंद्व खेळावे लागते. परंतु त्याची तत्वनिष्ठा एवढी प्रखर की गृहत्यागाचीच केवळ नव्हे, तर संपूर्ण इस्टेट गमावण्याची देखील संभाव्यता समोर दिसत असतानाही तो पित्याविरुध्द शेतकऱ्यांना उठवितो. आपल्या बापाच्या वाड्यासमोर तीनशे शेतकऱ्यांसह सत्याग्रह करतो व सत्याग्रहाच्या मार्गाने काही घडण्यासारखे नाही हे दिसून येताच लोकांकरवी आपल्या बापाच्या धान्याची पेवें खुशाल फोडून लुटवितो. या संघर्षमय जीवनाचे चित्रण या कादंबरीतून प्रभावीपणे रेखाटले आहे.

**<u>'समरांगण ' मधील ग्रामजीवनातील अंधश्रध्दा</u>**

ग्रामीण परिसरातील माणूस हा अशिक्षित असल्याने त्याला बऱ्यावाईट गोष्टींची जाण कमी असल्याने तो अंधश्रध्देच्या आहारी गेलेला दिसतो. ' समरांगण ' या कादंबरीतून याचे प्रभावी चित्रण आलेले आढळते.

खेड्यातील भिकारी बापूसाहेबांच्या वाड्यावर येऊन त्यांना शाप देऊन जातो. तेंव्हा बापूसाहेबांच्या मनाची थोड्या वेळाने झालेली तळमळ पाहून त्यावेळी त्यांचे मन अंधश्रध्देकडे हळूहळू कललेले दिसते.

गणूच्या मुलाला प्लेग झाला आहे ही बातमी जेंव्हा गावात पसरते तेंव्हा सगळी माणसं मरीआईच्या देवळात जातात. तेंव्हा मरी आई सांगते, " योकच घास म्या घेतलाय. मी तुमच्या गावाला धक्का लावणार नाही. पण तुम्ही आंबील, घुगऱ्याचं निवद करुन गावाभवतं चरक शिंपला पाहिजे. " [४] हा उपाय ऐकून खेडयातील माणूस अंधश्रध्देच्या आहारी जास्तीत जास्त असतो हे दिसते. केवळ या अज्ञानामुळेच गावकरी प्लेगची लस टोचून घ्यायलाही तयार नसलेले आढळतात.

कधी कधी शिक्षित माणसेही परिस्थितीमुळे अंधश्रध्देकडे वळताना दिसतात. जेंव्हा यशोदाबाईंना भगवान प्लेगने आजारी असलेल्या गणूच्या मुलाला पाहण्यास गेला हे समजते. तेव्हा त्याचे मन अशुभ कल्पनांनी विचलित होते. त्या म्हणतात, " घुबडाचा घुत्कार नि कुत्र्याचं रडणं सारखं माझ्या कानांवर आदळत होते. मध्यरात्रीच्या सुमारास एक टिटवी घरावरुन 'टीट्-टीट् टीट् ट्यूटी ! ' करीत वरतीकडे गेली." [५] यातून मनातील अंधश्रध्दामय भिती दिसते. याचबरोबर कादंबरीतील भगवान, सुरेंद्र माईच्या जाण्याने अस्वस्थ असतो. अशावेळी आश्रमात आलेल्या देवऋष्याकडून आपल्या मनातील चिंतेचा अंदाज घेण्याचा प्रयत्न तो करतो.

एकंदरीत मनाच्या या विकल अवस्थेत यशोदा व अंधश्रध्देकडे झुकलेला दिसतो.

**<u>'समरांगण ' मधील कौटुंबिक जीवन</u>**

शेतकरी वर्गाच्या कौटुंबिक जीवनाचे चित्रण फार मोठ्या प्रमाणात ग्रामीण कादंबरीत झालेली आढळते. किंबहुना तो ग्रामीण कादंबरीचा अविभाज्य भागच ठरतो.

म. भा. भोसले यांनी कौटुंबिक जीवनातील प्रसंगातून आपली कुटुंबाविषयी असणारी आपुलकी व्यक्त केली आहे. बापूसाहेबांच्या घरी जेंव्हा भगवानचा जन्म होतो. तेंव्हा बापूसाहेब भगवानच्या बाललीलेत रंगून जातात. येथे एका सुखी कुटुंब जीवनाची कल्पना येते.

बापूसाहेबांनी रखेली ठेवली हे समजूनही याबद्दल कधीही एक शब्दाने यशोदाबाईंनी बापूसाहेबांना विचारले नाही. यातून होणारी अनेक दु:खे ती सहन करत जाते. कौटुंबिक जीवन जगण्याला आवश्यक असणारी सहनशीलता येथे आढळते.

आपल्या मुलाला इस्टेट मिळावी म्हणून ताराबाईंची चाललेली खटपट. यासाठी ते सुरेंद्रला घरी बोलावून घेतात. त्यावेळी निर्माण झालेले कौटुंबिक वातावरण. तसेच संप संपल्यावर भगवान घरी येताच भगवान व सुरेंद्र या दोघा भावांमधील प्रेमपूर्वक संवाद, बापूसाहेबांनी आपल्या मुलाची आपुलकीने केलेली चौकशी, तसेच भगवानला लग्न या विषयावरुन झालेला आनंद हा प्रसंग ग्रामीण सुखी कौटुंबिक जीवनाची ग्वाही देतात.

आपल्या मुलावर जीवापाड प्रेम करणारी यशोदा माता भगवानच्या घर सोडून जाण्याने दु:खी होते. अशावेळी आपल्या पतीला विरोध करुन भगवानला आणावे का ? का, आपल्या पतीची इच्छा सांभाळावी ? अशा कात्रीत सापडलेल्या यशोदा मातेची जी तळमळ आहे ती समतोल कौटुंबिक जीवनातील एक समस्या वाटते.

कौटुंबिक जिव्हाळा हा केवळ रक्ताच्याय नात्यातून निर्माण होतो असे नाही. भगवान निघून गेल्याने दु:खी असलेल्या यशोदेला सुरेंद्र जेंव्हा कॉफी घेण्याचा आग्रह करतो त्यावेळी जो संवाद झाला त्यातून एक प्रेमळ कौटुंबिक जीवनाचे चित्रण घडते.

**ग्रामीण सामुहिक जीवनातील माणुसकी**

ग्रामीण जीवनात माणुसकी कशाप्रकारे जपली जाते याचे प्रत्यंतर कादंबरी देते. माणूस माणसासाठी बरेच काही करायला तयार असतो. माणुसकीपोटी तो स्वत:चा हक्क सोडायला तयार होतो. दुसऱ्याला संकटातून वाचवितो. याचे चित्रण म. भा. भोसले यांनी ' समरांगण' या कादंबरीत केले आहे.

शेतात राबणाऱ्या शेतकऱ्याचे मन किती दिलदार असते. ते मनाने किती श्रीमंत असतात. दुसऱ्यासाठी ते काहीही करतात याची जाणीव होते. रावसाहेब शेतकऱ्यांना संकटाच्या काळात नेहमी मदत करीत असलेले दिसतात. नदीला पाणी वाढल्यावर भगवान

शेतकऱ्यांना माणुसकीच्या नात्याने राहण्यासाठी वाडा देतात. मात्र बापूसाहेब या शेतकऱ्याला वाड्यातून हाकलून काढतात. एवढे होऊनही हेच शेतकरी त्याच वाड्याचे बांधकाम विना पगार करताना दिसतात. पोटाला चिमटा काढून जगणाऱ्या शेतकऱ्यांच्या मनाचा मोठेपणा या ठिकाणी लेखकाने दाखविला आहे. ही केवळ गुलामगिरी नाही. त्यामध्ये ग्रामीण सामुहिक जीवनातली माणुसकी लपलेली आहे.

डॉक्टर सदानंद आपले संपूर्ण आयुष्य ग्रामीण भागातील माणसांच्या सेवेसाठी घालवितो. औषधावाचून तडफडणाऱ्या हजारो रोग्यांना तर तो वाचवतोच शिवाय संकट समयी अनेक शेतकऱ्यांना तो मदतही करतो.

जेंव्हा महापूर येतो तेंव्हा नदीपलीकडे अडकलेली दोन माणसे नावेने आणण्यास कोणी तयार नव्हते. अशावेळी डॉक्टर स्वत: नाव चालविण्यास मदत करतात. या मदतीच्या भावनेतून डॉक्टरांची अंत:करणातली मानवता दिसून येते.

या कादंबरीचा नायक भगवान शेतकऱ्यांवर होणाऱ्या अन्यायाने पेटून उठतो. यासाठी स्वत:स मिळालेला हक्कही तो सोडायला तयार होतो. मुळात त्याची वृत्ती ही माणुसकी जपणारी अशीच आहे. माणूस म्हणून जगत असताना पिढ्यान्‌पिढ्या दारिद्र्यात जगणाऱ्या शेतकऱ्यांना संकटाच्या खाईतून तो वाचवितो. बापूसाहेब तीनशे शेतकऱ्यांना आळीपाळीने वाड्याच्या कामावर फुकट राबवून घेत होते हे समजते. तेंव्हा त्याला ते सहन होत नाही. तो चिडतो आणि म्हणतो, " धडधडीत अन्याय डोळ्यांनी बघून मी स्वस्थ तरी कसा बसू ? अन्यायाची चीड येणं हा माणूस धर्म आहे. बापूनी मला घराबाहेर काढलं. सगळी इस्टेट सुरेंद्रला दिली किंवा आणखी काही केलं तरी मला त्याची मुळीच पर्वा नाही. .........स्वत: जगण्यापेक्षा दुसऱ्याला जगविण्यातच माणुसकी आहे ! "[६] येथे भगवान स्वत: शेतकऱ्यांना कामाची मजुरी मिळावी म्हणून आपल्या वडिलांशी लढताना दिसतो.

ज्यांच्या कष्टामुळे आपल्याला अन्न मिळते तेच शेतकरी उपाशी आहेत. अशावेळी भगवानला जिलेबीचे जेवण जात नाही. तो म्हणतो, " ही जिलेबी देणारा देवच (शेतकरी)

उपाशी असेल तर आपण कसे खावे.'' यातून भगवानची गरीबांबद्दलची कणव आपुलकी यातून मानवता स्पष्ट होते.

अज्ञानी शेतकरी जेंव्हा प्लेगच्या साथीने आजारी पडतात. तेंव्हा माणुसकीच्या पोटीच डॉक्टर व भगवान सेवा करताना दिसतात.

वास्तविक ग्रामीण भागात माणुसकीचं नातं जास्त जोपासले जाते. त्यात समुहभावनाही असते. याचे चित्रण म. भा. भोसले यांनी ' समरांगण ' या कादंबरीत प्रभावीपणे केले आहे.

**'समरांगण ' कादंबरीतील ग्रामीण वास्तव चित्रण**

कादंबरीच्या प्रथम टप्प्यात बापूसाहेबांची सावकारी पाशवी वृत्ती व मनस्थिती यांचे चित्रण करण्यासाठी लेखकाने तयार केलेले वातावरण पाहण्याजोगे आहे.

बापूसाहेबांच्या सावकारी घराण्याला बट्टा लावील अशी बातमी बापूसाहेबांना वर्तमानपत्रात वाचावयास मिळते. ती म्हणजे मुंबईतील गिरणी कामगारांचा लढा भगवान लढवित आहे. यामुळे सकाळपासून विचित्र वाटणाऱ्या दिवसात बापूसाहेबांची मनस्थिती बिघडविण्यास या बातमीने भर पडते. याच दिवसाच्या दुपार सत्रात भिकाऱ्या बरोबर घडलेला प्रसंग. त्यावेळी चित्रित केलेले वातावरण बापूसाहेबांच्या मनस्थितीचे चित्रण करण्यास पूरक ठरते.

मात्र या दिवसाच्या अखेरच्या टप्प्यात जेंव्हा शेतकरी वाड्यावर पाणी वाढल्याने राहत आहे हे समजते. तेंव्हा रंगवलेले वातावरण बापूसाहेबांची पाशवी वृत्ती दर्शविण्यास महत्वाचे ठरते.

ज्या पावसावर गरीब शेतकरी जगत असतो. त्या शेतकऱ्याला जगानं उघड्यावर टाकल्यावर पाऊसही शेतकऱ्यांचे दुःखी दरिद्री जीवन जगासमोर कसे उघडे पाडतो. यासाठी चित्रित केलेले वातावरण शेतकऱ्यांच्या दरिद्री जीवनावर प्रकाश टाकण्यास पूरक वाटते.

बापूसाहेबांच्या वाड्याला आग लागल्यानंतर चित्रित केलेले वातावरण शेतकरी व सावकार यांच्यात सुरु होणाऱ्या संघर्षाची पूर्व सूचना देते. वाड्याला आग लागणे, पूर येणे

या घटना ग्रामीण जीवनाशी अधिक निगडीत आहेत. शेतकरी कुटुंबातील हंबीर व सुभद्रा यांच्यातील प्रेम शेतात वाढणाऱ्या पिकांबरोबर फुलणारे असते. जेंव्हा सुभद्रा म्हणते, " वारा जोराचा सुटला अन् तो उफणण्यासाठी वावडीवर उभा राहिला की मदनाच्या पाट्या मी इतक्या जलदीन द्यावा की त्याला क्षणाची फुरसत मिळू नये."[७] त्यांच्या प्रेमांकुराला बहर येईल असे ग्रामीण निसर्गाचे वर्णन वाचकांच्या मनात रुंजी घालू लागते.

या कादंबरीत खेड्यातील माणसांचे हाल व याच उपासमारामुळे सावकार व कूळ यांच्यातील संघर्षाला मिळालेले विशिष्ट वळण यातील संघर्ष चित्रण विशिष्ट वातावरण निर्मितीमुळे शक्य झाले आहे. त्यामध्ये लेखक यशस्वी ठरले आहेत.

बापूसाहेब व कुळांच्या बाजूनी असणारा त्यांचा मुलगा भगवान यांच्यातील संघर्ष रंगविताना लेखकांनी परिणामकारक वातावरण निर्मिती केली आहे.

म. भा. भोसले हे सातारा जिल्ह्यातील भिलवडी येथील मराठी शाळेत शिक्षक असल्यामुळे त्यांचे आयुष्य ग्रामीण जीवनाशी निगडीत झालेले आहे. याची साक्ष कादंबरी वाचीत असता जागोजागी आढळून येते. शहराबाहेरील ग्रामीण वातावरण कसे असते याबद्दल योग्य अशी कल्पना ही प्रस्तुत कादंबऱ्याच्या वाचनाने येऊ शकेल.

**'समरांगण ' कादंबरीतील भाषाशैली**

ग्रामीण साहित्यात बोलीभाषा महत्वाचे साधन आणि साध्य असते. तिच्याशिवाय ग्रामीण जीवन संभवू शकत नाही. बोली, निसर्ग, भौगोलिकता, आगळी संस्कृती यातून एक आगळे ग्रामीण मन संवर्धित होत असते. म. भा. भोसले यांची संवेदनशीलता ग्रामीणत्वाने भारलेली असल्याने त्यांची भाषाशैली ही त्यांच्या प्रकृती-पिंडाप्रमाणेच साधी व अकृत्रिम आहे. ' समरांगण ' कादंबरीतील भाषा ही दक्षिण सातारी देशातील आहे.

' समरांगण ' कादंबरीचे कथानक हे गरीब आणि असाह्य जनतेच्या दु:खाबद्दल वाटणारी व्यापक सहानुभूती आणि समाज समतेचा उदात्त ध्येयवाद या भोवती फिरत असल्याने त्याला साजेल अशी सरळ सोपी आणि ग्रामीण जीवनाचे चित्रण व्यक्त करणारी भाषाशैली वापरली आहे.

म. भा. भोसले यांच्या कादंबरी लेखनावर खांडेकरांच्या साहित्याचा मोठा प्रभाव जाणवतो. याचे प्रत्यंतर जागोजागी येते. " थोड्याश्या आचेन पाणी ऊतू येत अन् सांडतं. पण आग जास्त झाली तर तेच पाणी आटून जात." " बायकांचे अश्रू म्हणजे काचेच्या भांड्यासारखे असतात.", " श्रीमंतीच्या धुरात नुसते डोळेच बिघडत नाहीत तर हृदय सुध्दा धूरफटून जातं ! " लेखकांनी अतिशय ओघवती आणि काव्यमय भाषाशैलीचा वापर केलेला दिसतो. इतकेच नव्हे तर खांडेकर छाप सुभाषितांची पखरण जागोजागी करण्याची त्यांना आवड दिसून येते.

कादंबरीची परिणामकारकता वाढावी यासाठी मधून मधून म्हणी व वाक्प्रचार उदा. ' मुळाच्या पोटी केससुणीचा जन्म होतो ', ' खान तशी माती ' तसेच ' अंगाचा डोंब होणे', ' कल्लोळ माजणे ', ' अंगाचा तिळपापड होणे ' इत्यादी म्हणी व वाक्प्रचारांचा वापर केल्याने पात्रांची अभिव्यक्ती प्रभावी झाली आहे.

ग्रामीण सामाजिक जीवनाचे वास्तव चित्रण करणे हा हेतू त्यांनी विचारपूर्वक स्विकारला आहे. शेतकरी समाजाचे चित्रण करताना त्यातील तळमळ ते व्यक्त करतात. पिढ्यान्‌पिढ्या ज्या समाजाला त्रास सहन करावा लागला त्या समाजाच्या व्यथेला भावरूप देणे हे म. भा. भोसले यांच्या कादंबरीच्या भाषेचे एक अंग ठरते. अशा भाषा शैलीच्या साहाय्याने आपल्या जीवनात येणाऱ्या अनुभवांना ते उत्कट रूप प्राप्त करून देतात. त्यांची भाषा अत्यंत सुस्पष्ट व ओघवती आहे. तसेच कित्येक वाक्ये तर ठसकेबाज आहेत. पाल्हाळपणा कोठेच आढळत नाही. चटकदारपणा मात्र लेखक शेवटपर्यंत राखतात. त्यामुळे मराठी ग्रामीण कादंबरीत त्यांची कादंबरी प्रभावी ठरते व ठसलेली आहे.

## ' उघड्या जगात ' कादंबरीतील ग्रामीण संस्कृतीचे चित्रणविशेष

### 'उघड्या जगात ' कादंबरीतील ग्रामीण वास्तवाचे चित्रण

कृषिकेंद्रित समाज रचनेच्या विविध घटकोपघटकांनी प्रभावित ग्रामीण जनजीवन समृध्द असते. परिसरनिहाय जीवनाची जडणघडण होत असते. दैन्य आणि अज्ञानाचा

परंपरागत वसा ग्रामीण माणूस सांभाळताना दिसतो. अर्थात त्यात त्यांचा दोष नसतो. कारण जडशील भागधेय त्यांच्यावर लादलेले असते. ग्रामदेवता त्यांच्या जत्रा, उत्सव, मंदिरे व पूज्य स्थाने यांचे प्राबल्य व त्यातून तयार झालेली ग्रामीण माणसाच्या मन:पिंडाची जडणघडण उपरोक्त प्राप्त परिस्थितीच्या घटकोपघटकातून संभावलेली असते. त्यामुळे त्याचे आकलन आणि चित्रण ग्रामीण कादंबरीत अपेक्षित असते. ग्रामीण जगजीवनाचे खरे आकलन म. भा. भोसले यांच्या कादंबरीत दिसून येते.

' उघड्या जगात ' या कादंबरीत त्यांनी अस्सल ग्रामीण शेतकरी वर्गाच्या जीवनाचे चित्रण केले आहे. खेडयात राहून मातीशी व मालकाशी इमान राखणारा असा जोती हा पिढ्यान्पिढ्या उपेक्षित आहे. काकासाहेबांनी दिलेले कर्ज फेडता येत नाही म्हणून कृतज्ञता म्हणून त्यांच्या शेतात ढोर मेहनत तो करतो. इतकेच नव्हे तर त्याचे सारे कुटुंबही काकासाहेबांच्या घरी राबत असते. मालकाला देव समजून काम करणारे अज्ञानी कष्टकरी शेतकरी कुटुंब या कादंबरीत लेखकाने चितारले आहे.

काकासाहेबांच्या घरामध्ये राबणाऱ्या जोतीच्या कुटुंबातील हौशावर काकासाहेबांची वाईट नजर पडते. तिला कुंवारपणीच गर्भ राहतो. पण काकांचे हे पाप जोतीच्या ध्यानात येण्याच्या अगोदरच त्याला कॉलरा होतो आणि अंत:समयी तो सखारामला काकांच्या स्वाधीन करुन जगातून निघून एका कष्टकरी शेतकरी वर्गातल्या कौटुंबिक जीवनाची होणारी वाताहत चित्रित केली आहे.

ग्रामीण परिसरात अनेक सण, उत्सव वेगवेगळ्या रितीने पार पाडले जातात. याचे सविस्तर वर्णन या कादंबरीतून केलेले दिसते. पाडव्याच्या दिवशी सखारामला साप चावल्यावर सावित्रीबाई व चंद्राने त्याच्याबद्दल दाखविलेली आस्था, काकासाहेबांनी याबद्दल दाखविलेली बेफिकीरी खलवृत्तीचे दर्शन घडविते. याच दिवशी देवाचे पैसे कुळांच्याकडून वसुल केले जात असत. तेंव्हा सावकार स्वत:ला कसा फायदा मिळेल हे बघताना दिसतात. म्हणजेच देवाच्या नावाने सावकारांकडून कुळांवर होणारा अन्याय, शोषण याचे वास्तव दर्शन इथे पहावयास मिळते.

ग्रामीण भागातील माणूस आपल्या कुटुंबातील व्यक्तीप्रमाणे मुक्या प्राण्यावर प्रेम करताना दिसतो. मग चंद्राचे मांजराच्या पिल्लांवरील प्रेम असो किंवा सखारामचे खोंडावरील प्रेम या प्रेमापोटी घडलेले प्रसंग ग्रामीण वास्तवतेला प्राधान्य देणारे ठरतात.

बऱ्याचवेळा ग्रामीण परिसरात लग्नासारख्या गोष्टीमुळे ग्रामीण कुटुंबात अनेक प्रश्न निर्माण होताना दिसतात. जोती आपल्या मुलीसाठी हुंडा न देता न घेता लग्न करायचं ठरवतो तर काकासाहेब आपल्या मुलीचे लग्न तिच्या विना परवानगीने ठरविताना दिसतात. एकंदरीत लग्न या गोष्टीबद्दल ग्रामीण भागात जी परंपरा आहे त्याची कल्पना येते.

सावकाराला व्याजासह पैसे परत करुनही सावकार आपली जमीन देत नाही. म्हणून पिरा सावकारावर हल्ला करतो. याच हल्ल्याचा सूड घ्यावयाच्या भावनेपोटी सावकार पिराच्या गंजीला आग लावण्यास सांगतात. एकंदरीत ग्रामीण भागात दिसून येणाऱ्या सूडवृत्तीवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न म. भा. भोसले यांनी ‘ उघडया जगात ’ कादंबरीमधये प्रभावीपणे केलेला दिसतो.

ग्रामीण जीवनात जगत असताना मनुष्याला अनेक प्रसंगातून माणसाच्या वृत्ती, प्रवृत्तीची जाणीव होत असते. काकासाहेबांच्या घरात वाढणाऱ्या सखारामला काकासाहेबांचा अन्याय, अत्याचारी, सावकारी, वृत्तीचा परिचय होतो. तसेच स्वत:च्या गुलामगिरीची अन्यायाची जाणीव जेंव्हा होते तेंव्हा तो काकासाहेबाच्या विरुध्द पेटून उठतो व त्यांना मारावयास निघतो. यातून ग्रामीण भागात दिसणारे संघर्ष याचे वास्तव चित्रण दिसून येते.

म. भा. भोसले यांनी जो ग्रामीण परिसर अनुभवला ज्या परिसराच्या सुक्ष्म निरीक्षणातून त्यांनी आपली कथाबीजे साकारुन कादंबऱ्या लिहिल्या. त्यामुळे कादंबरीमध्ये ग्रामीण परिसर त्यांच्या शब्दाशब्दातून जिवंत झालेला आहे.

**‘उघड्या जगात ’ कादंबरीतील दारिद्रयाचे चित्रण**

ग्रामीण परिसरातील शेतकऱ्याच्या वाट्याला येणारा महत्वाचा प्रश्न दारिद्रय हा आहे. पिढ्यान्‌पिढ्या आपले जीवन दु:खात दारिद्रयात तो जगत असतो. म. भा. भोसले यांच्या कादंबरीतून दारिद्रयाचे प्रभावी चित्रण केले गेले आहे.

' उघड्या जगात ' या कादंबरीत काबाडकष्ट करुन जीवन जगणाऱ्या जोतीच्या कुटुंबाचे चित्रण येते. काकासाहेबांच्या शेतात राबून पोट भरणे व प्रामाणिकपणे जगणे हा त्यांच्या जीवनाचा महत्वाचा भाग आहे. पण जोतीच्या मृत्युमुळे सारजाची स्थिती महासागरात बुडालेल्या दुबळ्या माणसासारखी होते. जोतीच्या जाण्याने ती एकटी जमिनीवरील कर्ज फेडू शकत नसल्याने तिची परिस्थिती दारिद्रयाच्या खाईत खितपत पडताना दिसते. या दारिद्रयामुळे ती हौशाचे लग्न करु शकत नव्हती व सखारामची शिक्षणविषयक गरजही पूर्ण करु शकत नव्हती.

अशावेळी काकासाहेबांच्या वासनेची बळी ठरलेली हौशा आपल्या दुःखी दारिद्रयाच्या वेदना कुणाला सांगू शकत नव्हती. यातून अनेक दुःखांना तिला सामोरे जावे लागते. या दुःखामुळे ती निघून जाते. तर सारजा हौशाच्या जाण्याच्या दुःखाने आजारी पडते. परंतु घरच्या दारिद्रयुळे सखाराम काही करु शकत नाही. यातच सारजाचा मृत्यु होतो.

काकासाहेबांच्या शेतात काम करणारे गडी दिवस उगवल्यापासून संध्याकाळी ' कडूसं ' पडेपर्यंत शेतात काम करतात. परंतु हेच गडी आपल्या पोटाची गरज मात्र भागवू शकत नाहीत. या गड्यांकडे पान-सुपारीचा खर्च करणे म्हणजे त्यांच्या आवाक्याबाहेरची गोष्ट असते. इतकं काम करुनही तो पिढ्यान्‌पिढ्या दारिद्रयात आणि दुःखात जगताना दिसतो. याचे प्रभावी चित्रण म. भा. भोसले यांनी या कादंबरीत केले आहे.

**<u>'उघड्या जगात ' कादंबरीतील भूतदया</u>**

ग्रामीण भागात शेतकरी हा आपल्या प्राण्यावर जीवापाड प्रेम करीत असतो. त्यामुळे त्यांच्यामध्ये एक पारंपारिक नाते निर्माण होते. ज्यावेळी या प्राण्याला एखादी वेदना होते त्यावेळी ती मालकालाही होताना दिसते. या प्राण्याला तो आपल्या कुटुंबातील घटकच समजतो. या प्राण्याच्या मृत्युने मात्र त्याला अनंत यातना होताना दिसतात.

' उघड्या जगात ' या कादंबरीतील नायक सखाराम काकासाहेबांनी सांगितले म्हणून पिराच्या मळीतील गवताची गंजी पेटवून देतो. मन कठोर करतो. पण मांडवातला खोंड

मोठमोठ्याने डिरकू लागल्यावर त्याच्या अंगातलं शेतकऱ्याचं रक्त त्याला स्वस्थ बसू देत नाही. तो अस्वस्थ होतो. परत फिरतो आणि खोंडाच दावं कापून त्याला मोकळा करतो. यातून कृषकाचा पिंडधर्म कसा असतो तो म. भा. भोसले यांनी नेमका हेरला आहे.

त्याचप्रमाणे काकासाहेबांच्या गोठ्यात असणारा ' पठाण ' या म्हाताऱ्या बैलाला ओला शेवऱ्या टाकणारा सखाराम ज्यावेळी या बैलाला विकण्यास काकासाहेबांना विरोध करतो तेंव्हा त्याचे मुक्या प्राण्यावरील प्रेम वाचकांच्या लक्षात येते.

एखादा गुणवान प्राणी जर मेला तर घरातील माणूस मरण्यापेक्षाही जास्त दु:ख करणारी माणसे ग्रामीण जीवनात आढळतात. त्याचे कारण असे प्राणी त्यांचा सुध्दा जगण्याचा एक भाग झालेला असतात. या कादंबरीत चंद्राचे मनीवर व मनीच्या पिल्लांवर जीवापाड प्रेम होते. तेंव्हा बोक्याने तिन्ही पिलांना मारल्याचे ती बघते तेंव्हा ती बोक्याला ठार मारते. आपल्या पिल्लांच्या मरण्याने ती दु:खी होते. अशी ही मुके प्रेमबंध जोडणाऱ्या ग्रामीण वास्तवावर म. भ. भोसलेंनी भावनिक प्रसंगातून प्रकाश टाकला आहे.

म. भा. भोसले हे ग्रामीण भागातील असल्याने त्यांच्या नजरेतून या गोष्टी सुटल्या नाहीत. त्यामुळे अशा प्राणीमात्रांविषयीच्या मायेच्या गोष्ट अवतीर्ण झालेल्या दिसतात.

**'उघड्या जगात ' कादंबरीतील संघर्ष**

जीवनात संघर्ष हा ठरलेला असतो. त्याचा प्रत्यय वारंवार येत असतो. त्या संघर्षमय जीवनाचे चित्रण ग्रामीण कादंबरीत प्रकर्षाने आलेले दिसते.

' उघड्या जगात ' या कादंबरीत देवाच्या नावे कुळांवर अन्याय केला जात होता. हे सर्वांना माहीत असूनही त्याविरुध्द कोणी आवाज उठवत नव्हते त्यावेळी शिवराम खोत हा तरुण त्या विरुध्द बालतो. तेंव्हा त्याला दाबले जाते. येथे कुळांच्या मनामध्ये धुमसत असलेला संघर्ष जाणवतो.

याच शिवरामचा वडील पिरा आपली जमीन व्याज देऊनही परत देत नाही. म्हणून काकासाहेबांवर धावून येतो. व्याज देऊनही अजून कर्ज फिटत नाही म्हणणारे सावकार व शेतकरी यांच्यातील संघर्ष लेखकाने दाखवून दिले आहे. सखारामलाही त्याच्यावर होणाऱ्या

शोषणाचीही जाणीव पिराच करुन देतो. तो म्हणतो, " सखाराम, तू आमचा हाईस, जोतीचा पोरगा हाईस, फुकट मान मिळतंय म्हणून जोती आसा सावकाराला कधी भाळला नव्हता. तू बी भाळू नगंस. कुराडीचा दांडा गोताला काळ हु नगस ! आरं तुझी चार एकर जमीन त्यांनी दाबलीया, आनं तू गुरागत राबतुयास म्हणून ते तुझी माया करत्याती ! " यातूनच सखारामवर होणाऱ्या अन्यायाची जाणीव करु देऊन पिराजी संघर्षाचे मूळ रोवतो.

चंद्राने बोक्याला मारण्याचा प्रसंग तिच्या मनात अन्यायाविरुध्द असलेली चीड दर्शविणारा आहे. त्याचप्रमाणे सखालाही वारंवार अन्यायाविरुध्द प्रतिकार करण्यास ती प्रेरीत करीत असताना दिसते.

सखाराम या गड्याने आपला वारंवार उपमर्द केला म्हणून बापूराव सखारामची पिळवणूक करण्याचा प्रयत्न करतात यातून दोघांच्यात संघर्ष होतो.

' धन्याची चाकरी हीच आपली भाकरी ' हे पित्याचे शब्द लक्षात ठेवून सुमारे १५ वर्षे सखाराम काकासाहेबांच्या घरी राबतो. परंतु काकासाहेबांच्या वरकरणी मायेच्या पडद्याआड लपलेला त्यांचा स्वार्थी, पाताळयंत्री व कावेबाज स्वभाव लक्षात येतो. तसेच त्यांच्याकडून जमीन परत मिळणे शक्य नाही हे कळून चुकते. त्याचबरोबर संतापाने बेभान होऊन तो काकासाहेबांचा खून करावयास धावतो. चंद्राचे सखारामवर प्रेम असते. मात्र याला काकासाहेबांचा विरोध असतो. हाच झगडा शेवटपर्यंत या कादंबरीत रंगवला असून शेवटी सखारामचा विजय दाखविला आहे.

**'उघड्या जगात ' कादंबरीतील ग्रामीण जीवनातील अंधश्रध्देचे चित्रण**

अज्ञान व अशिक्षितांमध्ये अंधश्रध्देची पकड घट्ट बसलेली असते. अशा अंधश्रध्दामय जीवनाचे दर्शन खेड्यामधील लोकांच्यामध्ये जास्त दिसून येते. ग्रामीण भागात राहून लेखन करणाऱ्या म. भा. भोसले यांनी याचे दर्शन आपल्या कादंबरीमध्ये प्रभावीपणे घडविले दिसते.

अडाणी, अज्ञानी लोकांचे जीवन हे अंधश्रध्दामय असते. यातूनच कॉलरा आल्यावर गावातल्या लोकांना शिंपलेले चरक, गंजीला आग लागल्यावर सखा व काकासोबांनी केलेली

कृती, मांजर मारण्यामागील समज या अनेक प्रसंगातून ग्रामीण जीवनात दैन्य समवेत अज्ञान, अंधश्रध्दा समजूतीचे साम्राज्यही येथे असते हे समजते.

' उघड्या जगात ' या कादंबरीत अमणापूर या खेड्यात जेंव्हा कॉलरा सुरु होतो. तेंव्हा खेड्यातले लोक खेड्यातील रितीप्रमाणे देवी अंगात आणून कॉलरा कमी करण्याचा मार्ग शोधताना दिसतात. यातून त्याच्या मनामध्ये घट्ट बसलेली अंधश्रध्देची पकड दिसते. तसेच याच खेड्यातील सारजा म्हणते, " एखादं जनावर चुकून जाणं अन् ते पुन्हा न सापडणं हे मोठं अशुभ समजतात." [९]

कडब्याच्या गंजीला आग लागल्यावर सखाराम लोकांच्या गर्दीतून पुढे जातो. मातीच्या दोन मुठी आगीत फेकतो आणि काकासाहेबांच्या हातातला दह्याचा घट चौफेर फिरवून आगीत ओततो. पारंपारिक अंधश्रध्दा आणि समजूती याचा अंमल ग्रामीण माणसाच्या हाडीमासी खिळलेली असतो. त्याचे प्रत्यंतर या प्रसंगातून घडते.

भूतपिशाच्यावरचा गाढ विश्वास हा ग्रामीण माणसांच्या अंधश्रध्देचा एक महत्वाचा भाग आहे. या कादंबरीमध्ये पिराच्या गंजीला आग लावावयास निघालेल्या सख्याला दिसलेले भूत लेखक चित्रित करतात. " रस्त्याकडील झाडाच्या उंच फांदीवर एक अक्राळविक्राळ अशी पुढं दात आलेली अन् केस मोकळे सोडलेली बाई बसलेली त्याला दिसली. ती इतकी अक्राळविक्राळ होती की ती उंच फांदीवर बसली होती. तरी तिचे पाय खाली जमिनीवरच टेकले होते.

" तिला पाहताच सखारामला कापरं भरलं !

तो आवाज तिचाच होता तर ?" [१०]

हा विचार त्याच्या मनात येताच त्याचे पाय तिरासारखे पळत सुटले. यातून स्वप्न, वास्तव आणि अंधसमजुती प्रमाण मानून म. भा. भोसले यांनी हा प्रसंग चितारला आहे आणि तो योग्य आहे. कारण त्यामध्ये ग्रामीणत्व आहे.

## 'उघड्या जगात ' मधील कौटुंबिक जीवन

ग्रामीण परिसरामध्ये वावरणारा, शेतात राबणारा शेतकरी व त्याचे कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीशी असणारे संबंध याचे प्रभावी चित्रण म. भा. भोसले हे या कादंबरीतून करताना दिसतात. ' उघड्या जगात ' या कादंबरीमध्ये कौटुंबिक जीवनातील प्रसंगामधून कुटुंबाविषयी चिंता, प्रेम, जिव्हाळ्याची भूमिका स्पष्ट केली आहे.

ग्रामीण भागातील कुटुंबात असणाऱ्या मुलीच्या लग्नाबद्दलची चिंता दिसते. हौशाच्या लग्नाबद्दलची चिंता दिसते. हौशाच्या लग्नाबद्दलची चिंता जोती व सारजाला असलेली दिसते. परंतु मनासारखे स्थळ मिळत नसल्याची खंत तो आपल्या पत्नीला सांगितलेला दिसतो.

कष्टाने जीवन जगणारी सारजा आपल्या मुलीच्या वाट्याला आलेले दुःख जोतीला सांगत नाही. संयम राखून स्वतःच याचा विचार करीत राहते. याबद्दल एक वाक्यही न काढता आपणच सर्व सहन करीत कौटुंबिक नाते जपते. इतकेच नव्हे तर आपल्या मुलीच्या पाठीशी राहून गावकऱ्यांना तोंड देण्यास ती धीराने उभी राहते. यातून ग्रामीण कष्टी कौटुंबिक जीवनातील वास्तव म. भा. भोसले हे चित्रित करतात.

गुढी पाडव्याच्या सणाला पुरण-पोळ्याचा नैवेद्य बनविण्याचा रिवाज असतो. परंतु त्या दिवशी सखारामला साप चावल्यामुळे सावित्रीबाई सण करावयाचा की नाही या चिंतेत असतात. सखारामविषयी सावित्रीबाई व चंद्रा यांनी दाखविलेल्या चिंतेतून कौटुंबिक नात्यातील जिव्हाळा प्रतीत होतो. कारण सावित्रीबाई सखाला आपल्या कुटुंबातीलच एक सदस्य समजत असतात.

काकासाहेब आपल्या मुलीच्या लग्नाची तयारी करण्यास जेंव्हा सावित्रीबाईंना सांगतात. त्यांना आपल्या लग्नाची आठवण होते तेंव्हा सावित्रीबाईशी जो संवाद होतो त्यातून काकासाहेब व सावित्रीबाईंच्यातील गोड नातेसंबंध व्यकत करताना दिसते.

काकासाहेब जेंव्हा विचारतात, " तुझं माझं लग्न कसं जमलं आठवतं तुला."

"आठवतं की ......"

" कसं ? "

" तुम्ही शिकारीला गेला होता. तिथं एक वाघ तुमच्या अंगावर चालून आला......"[११]

कौटुंबिक जीवनातील आनंदमय वातावरण जे कौटुंबिक नातेसंबंध घट्ट होण्यास जरुरीचे आहे. त्याचे दर्शन येथे लेखकांनी प्रभावीपणे केले आहे.

म. भा. भोसले यांनी कादंबरीत कौटुंबिक सुख-दु:खाची अस्सल पार्श्वभूमी घेतलेली आहे.

**'उघड्या जगात ' मधील माणुसकीचे चित्रण**

माणुसकी, मानवता ही मूल्ये समाजधारणेसाठी समाजाच्या उत्थानासाठी अत्यावश्यक असतात. आजच्या ग्रामीण कथा कादंबऱ्यातील ' माणूस ' मूल्याचे नाते देशीयतेशी आहे. ही देशीयता इथल्या ग्रामीण जीवनात शेतीमातीत सामावलेली आहे. दैन्याने उबगलेली दु:खी माणसे आत्महत्याकडे वळतात किंवा सुडाने तरी पेटून उठतात. परंतु संपूर्ण समाजविघातक कृत्ये त्यांच्या हातून घडत नाही. सर्वहार माणसे जेंव्हा एकमेकांना जपतात तेंव्हा तेथे मानवता सन्मानीत होताना दिसते.

' उघड्या जगात ' या कादंबरीत ही माणुसकी ही शेतकऱ्यांच्या अंगात मुरलेली जाणवते. गुढीची काठी धूत असलेला अमणापुरातला इसम सखारामशी कोणतेही नातेसंबंध नसतानाही मदत करताना दिसतो. सखारामला साप चावल्यावर उपचारासाठी लखू म्हाताऱ्यास बोलवणे, काकासाहेबांना याची कल्पना देणे यातून त्या इसमाच्या मनात असलेली माणुसकीच सिध्द होते.

याचदिवशी चंद्रा व सावित्रीबाई सखारामवर घडलेल्या या घटनेने चिंताग्रस्त होतात यातून त्यांची माणूसकीवर असलेली श्रध्दा दर्शविते.

माणूस हा प्रेमाचा भूकेला असतो. देवाची देणगी समजल्या जाणाऱ्या प्रेमासाठी जगणारी ही माणसे ग्रामीण भागात ही दिसतात. या प्रेमाचे मानवतेचे उदात्त चित्रण ' उघड्या जगात ' या कादंबरीतही होताना दिसते.

काकासाहेबांची मुलगी चंद्रा ही त्यांच्याच घरात चाकर म्हणून असलेल्या सखारामवर प्रेम करताना दिसते. या प्रेमामुळे ती सखारामची काळजी घेताना दिसते. सखारामसाठी भाकरी बनवून शेतात घेऊन जाणे, सखाला साप चावल्यावर त्याला पाहण्यास देवळात जाणे, साताऱ्याला जाताना त्याला दशमी बनवून देणे या अनेक प्रसंगातून चंद्राचे मानवता प्रेम प्रकट होताना दिसते.

सखाराम हा काकासाहेबांच्या शोषणाला बळी ठरलेल्या गड्यांना जेंव्हा धान्याची जरुरी असते तेंव्हा काकासाहेबांची वाट न पाहता पोत्याच्या ठेलीतले दाणे मोजून घालतो. काकासाहेबांच्या रागास न भिता सखाराम हा मानवतेपोटीच या गड्यांना मदत करताना दिसतो.

काकासाहेब जेंव्हा सखारामला घराबाहेर काढतात. त्यावेळी काकासाहेबांसाठी ज्याचे वैर पत्करले तो शिवराम मात्र सखारामला घरी घेऊन जातो आणि माणुसकीच्या नात्याने सखाला खायला घालतो.

एकंदरीत ग्रामीण भागात प्रचंड प्रमाणात संघर्ष, दुःख, दैन्य, धुमसत असले तरी ग्रामीण मानवता असलेले माणुसकीचे मूळ कोणत्याही संकटात प्रखरतेने जाणवतेच. ‘ उघड्या जगात ’ या कादंबरीत अशा माणुसकीचे दर्शन लेखकाने घडवले आहे.

**‘उघड्या जगात ’ मधील ग्रामीण वातावरणाचे चित्रण**

कोणतीही घटना अगर प्रसंग चित्रित होत असताना ती प्रभावीपणे ज्यावेळी चित्रित होते तेंव्हा वातावरण निर्मिती केली जाते. तरच त्या घटनेला अथवा प्रसंगाला वजन राहते. ग्रामीण कादंबरीतील एखादी घटना प्रसंगाचे चित्रण व्हायला ग्रामीण वातावरणाची खूप मदत होते.

ग्रामीण भागात शेतकरी कुटुंबात शेतकऱ्याला पेरणीच्या काळात पहाटेपासून कडुसं पडेपर्यंत करावे लागणारे कष्ट. तसेच या पेरणीच्या दरम्यान कोणत्याही शेतकऱ्याकडे इतर कामाकडे किंवा इतर गोष्टीकडे लक्ष द्यायला वेळ नसतो. या सर्व ग्रामीण वातावरणाची पेरणी

म. भा. भोसले कादंबरीच्या सुरुवातीस खुमासदार पध्दतीने केलेली दिसून येते. तिथेच कादंबरी ग्रामीण वातावरण निर्माण करताना जाणवते.

हिमतीन जगणाऱ्या शेतकरी कुटुंबातील व्यक्तीच्या आयुष्याची होणारी वाताहत. अगदी पूरक वातावरणात लेखकाने प्रभावदार पध्दतीने चित्रित केले आहे.

खेड्यामधील सावकाराच्या वाड्यातील आणि ग्रामीण कुटुंबातील दैनंदिन जीवनशैली प्रतित करण्यासाठी प्रभावी असे वातावरण निर्माण केले असून त्याच खेड्यामध्ये पहाटेच्या वेळी आढळणारे रस्त्याकाठचे व नदीकाठचे चित्रण हे सखारामवर येणाऱ्या संकटाची सूचना देण्याच्या हेतूने पूरक ठरते.

सखारामला स्वत:च्या भविष्याबद्दल वाटणारी भिती लेखकाने म्हाताऱ्या बैलाच्या वर्णनातून सूचित केली आहे. ती अत्यंत प्रभावीपणे सादली गेली आहे. तसेच पिराच्या गंजीला आग लावायला जेंव्हा सखाराम जातो. त्यावेळी गावातील पारंपारिक अंधश्रध्दा व समजुती यांना उगटा देणारे वातावरण लेखकांनी चित्रित केली आहे.

संघर्षमय जीवनाने समृध्द असे खेड्यातील जीवन दर्शविण्यासाठी लेखकांनी नेहमीच प्रभावी वातावरण निर्माण केलेले दिसते.

कादंबरीमध्ये अधून मधून व्यक्तिचित्रणास तसेच त्यांच्या भावाभिव्यक्ती व्यक्त करण्यास पूरक असे वातावरण आलेले दिसते. उदा. सखारामला अनेक घटना व प्रसंगातून स्वत:च्या गुलामगिरीची जाणीव होऊ लागते. त्याला वाटू लागते. आपण आयुष्यभर असंच चाकरी करत राहणार का या प्रश्नाभोवतीच तो गुरफटतो. तो म्हणतो, " आपलं जीवन या जमिनीसारखंच रुक्ष, उदास आहे. आज रुक्ष दिसणाऱ्या या जमिनीवर उद्या पावसाला सुरुवात झाली की पिकाचे कोवळे कोवळे अंकूर उठतील अन् तिला नंदनवनाचं वैभव प्राप्त होईल ! पण आपल्या जीवनात अशी कसलीच आशा नाही ! आजपर्यंत आपण 'धन्याची चाकरी हीच आपली भाकरी ! ' असं समजून काकासाहेबांची चाकरी करीत आलो आणि पुढंही तशीच बापूरावांची करीत राहायचं काय ?" [१२] यातून सखारामची भावाभिव्यक्ती परिणामकारकरितीने दर्शविली आहे आणि तीही कृषिसंबंधीच्या उदाहरणातून दर्शविली आहे.

कादंबरीच्या सुरुवातीस अधून मधून आलेल्या सखारामच्या भावाभिव्यक्तीमुळे. नंतर येणारे सखाराम व काकासाहेब यांच्यातील संघर्षास उठाव मिळण्यास मदत झालेली दिसते. हा संघर्ष अत्यंत उठावदार वातावरणात लेखकाने चित्रित केला आहे. या संघर्षाच्या चित्रणामुळे वाचक नक्कीच विचारमग्न होतो.

एकंदरीत वातावरण हा कादंबरीचा अविभाज्य घटक आहे. ' उघड्या जगात ' या कादंबरीत खेडेगावातील वातावरणाचा परिपोष लेखकाने उत्तम साधलेला असून ग्रामीण पार्श्वभूमी रेखाटण्यात लेखकाचा हातखंडाच असलेला दिसतो. कादंबरीची भाषा ही कादंबरीच्या पार्श्वभूमीशी सुसंगत अशी वाटते.

**'उघड्या जगात ' कादंबरीची भाषाशैली**

जीवनातील वास्तवाचे प्रकटन साहित्यातून व्हायचे असेल तर त्या त्या जीवनातल भाषेचा विचार आणि वापर लेखकाला करावाच लागतो. म्हणून भाषा आणि शैली हे वाङमयाचे परस्परपूरक आणि अविभाज्य घटक आहेत. भाषा म्हणजे कलाकृतीतील आशयाचा एक अपरिहार्य असा आविष्कार असतो. आशयाच्या अनुषंगाने भाषेची ठेवण, मांडणी आणि लय ठरत जाते आणि ग्रामीण कादंबरीच्याच नव्हे तर एकूण ग्रामीण वाङमयाच्याच आविष्कारात भाषेला अतिशय महत्वाचे स्थान असते. भाषा हा सामूहिक आविष्कार असल्यामुळे तेथील परिसर त्या परिसरातील देवदेवता, संस्कृती आणि माणसांची ठेवण प्रकट होते. त्यामुळे भिलवडीसारख्या एका गावचा वसा आणि वारसा सांगणारे म. भा. भोसले यांचे भाष्य म्हणजे गावप्रेम आहे. गाव संस्कृतीचा शोध आहे. त्यातूनच हे ग्रामीण संस्कृतीचा उदात्त बोध ' उघड्या जगात ' या कादंबरीतून घेताना दिसतात.

' उघड्या जगात ' ही कादंबरी नव्या भाषाशैलीने नटलेली, कल्पकतेच्या भराऱ्यांनी गुंफलेली आणि अनेक रसालंकारानी सजलेली ग्रामीण जीवनांवरील वाङमयात जेष्ठ ठरणारी अशी स्वतंत्र कादंबरी वाटते.

लेखकांचे स्वत:ची अशी खास काही भाषा असते. शैली असते. याची पुरेपूर जाणीव ही कादंबरी अभ्यासताना वाटते. ग्रामीण वातावरण निर्माण करण्यासाठी ते ज्या काही शब्दांची योजना करतात तीच त्यांची भाषाशैली ठरते असे म्हंटल्यास वावगे ठरणार नाही.

एकंदरीत कादंबरीतील ग्रामीण पार्श्वभूमीशी सुसंगत अशी भाषा आलेली आहे. कादंबरीत कथा प्रसंगाची गुंफण परिणामकारक तऱ्हेने केली असून भाषाही सुबोध प्रसंगानुरुप व प्रसादपूर्ण असल्याने कादंबरी संपूर्ण वाचल्याशिवाय ठेववत नाही.

म. भा. भोसले यांची भाषा काळ्या जमिनीप्रमाणे सकस, पिळदार व सामान्य लोकांना समजेल अशी आहे. म्हणूनच मधून मधून पात्रांच्या तोंडून निघालेल्या व्यक्त्यव्यातून जीवनातील गुढ रहस्याची उकल करणारे तत्वज्ञान सांगताना दिसतात. उदाहरणार्थ चंद्रा आयुष्य म्हणजे काय ? तसेच प्रीतीचा अर्थ सांगताना लेखकाने जी भाषा वापरली आहे. ती वाचकाच्या ह्रदयाला शिवून जाते. तसेच सखारामच्या मनात निर्माण झालेला ' आयुष्यभराची चाकरी ' विषयक प्रश्न, मालकाविषयी सांगितलेले मत स्वत: गुलामगिरीची जाणीव करुन देणाऱ्या व्याख्यानबाजी कादंबरीची परिणामकारकता वाढविण्यास पूरक ठरते.

म. भा. भोसले यांच्यावर खांडेकर व फडके याचा प्रभाव असल्याचे सांगून त्यातील त्रुटी सांगताना शांता शेळके म्हणतात, " प्रा. फडके यांच्या शैलीचा लेखनावर बराच परिणाम झालेला दिसतो. पण त्या असामान्य भाषाप्रभूच्या लेखनीचे साहित्य आणि माधूर्य मात्र या लेखकास अजून साधलेले नाही. क्वचित खांडेकरांची छपाई प्रस्तुत लेखकांवर आढळते. " [१३]

लेखकाची भाषा बरीच सफाईदार, सुबोध आहे. ती ओघवती असून लेखकाचे मनोगत स्पष्ट करावयास तिला फारसे कष्ट पडत असलेले दिसत नाही. कादंबरीतील प्रकरणे प्रभावी रेखीव आणि स्पष्ट असून प्रकरणांच्या नावात अत्यंत मार्मिकता आहे. ग्रामीण जीवनाच्या पार्श्वभूमीची सुरस वर्णने व मोजक्या पात्रांचे परिणामकारक चित्रण यामुळे कादंबरी वाचनीय झाली आहे.

## सारांश

१. सारांश रुपाने असे म्हणत येते की, ‘ समरांगण ’ व ‘ उघड्या जगात ’ या कादंबरीत चित्रित झालेली ग्रामीण संस्कृती वास्तवदर्शी वाटते.

२. ग्रामीण समाज तिथले रीतीरिवाज, तिथली माणसे, निसर्ग जगण्याची तऱ्हा ह्या गोष्टी निश्चित निराळ्या असतात. त्या कृषिसंस्कृतीशी निगडीत असल्याने ग्रामीण समाज थोडा वेगळा पडतो अशा समाजाच्या भावभावना म. भा. भोसलेंनी आपल्या समर्थ लेखनीतून चित्रारल्या आहेत.

३. म. भा. भोसले यांनी दोन्ही कादंबरीत चित्रित केलेले शेतकरी वर्गाचा संघर्ष ग्रामीण पातळीवर अस्सल वाटतात. असा संघर्ष ग्रामसंस्कृतीचे निदर्शक असल्याने अशा कादंबरीतील संवेदनशीलता महत्वाची असते.

४. म. भा. भोसले यांचा पिंड कृषिकर्मकाचा असल्याने या कादंबऱ्यात त्यांनी भूतदया म्हणजे, मूक्या प्राण्यावरील प्रेम अचूक टिपले आहे. त्यामुळे भूतदया हा इतर साहित्यात क्वचित आढळणारा पण ग्रामीण संस्कृतीत आढळणारा विशेष म. भा. भोसले यांच्या कादंबरीचा अविभाज्य घटक बनल्याचे दिसते.

५. “ कादंबरीकार म्हणून म. भा. भोसले यांच्या कादंबरी लेखनावर फडके-खांडेकर यांच्या लेखनाचा प्रभाव दिसतो. त्यांच्या कादंबऱ्यांची भाषा शैली प्रासादिक, प्रवाही व सामान्य लोकांना समजेल अशी आहे. तसेच विविध रसालकारांनी सुभाषितांनी नटलेली आहे. त्यांची कादंबरी वाचनीय असून ग्रामीण वाचकांच्या अभिरुचीचा ती ताबा घेते.

आता या पुढील प्रकरणामध्ये कादंबरीकार म. भा. भोसले यांच्या लेखनशैलीची वैशिष्ट्ये अभ्यासावयाची आहेत.

# संदर्भ


१. भोसले. म. भा. : ' समरागंण ' ग्रामीण प्रकाशन, धनगांव, द्वि. आ. १९६०, पृ. क्र. ७६.

२. भोसले. म. भा. : ' समरागंण ' उनि पृ. क्र. १५.

३. जोशी. एस. एम. : ' झगडणाऱ्या व्यक्तीचे जीवन रंगविण्याचा केलेला एक अभिनंदनीय प्रयत्न ' दैनिक लोकशक्ती, सोमवार दि. २२ डिसेंबर १९४१.

४. भोसले. म. भा. : ' समरागंण ' उनि पृ. क्र. ७८.

५. भोसले. म. भा. : ' समरागंण ' उनि पृ. क्र. ८८.

६. भोसले. म. भा. : ' समरागंण ' उनि पृ. क्र. ७०.

७. भोसले. म. भा. : ' समरागंण ' उनि पृ. क्र. ३६.

८. भोसले. म. भा. : ' उघड्या जगात ', ग्रामीण प्रकाशन, धनगांव, तृ. आ. १९१४, पृ. क्र. ६७.

९. भोसले. म. भा. : ' उघड्या जगात ' उनि पृ. क्र. ३६.

१०. भोसले. म. भा. : ' उघड्या जगात '
उनि पृ. क्र. ९१.

११. भोसले. म. भा. : ' उघड्या जगात '
उनि पृ. क्र. १२३.

१२. भोसले. म. भा. : ' उघड्या जगात '
उनि पृ. क्र. १४०.

१३. शेळके शांता ज. : ' ग्रामीण जीवनाचे एक वास्तव चित्रण'
दै. जयहिंद, दि. ८-१-१९४८.